# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ३४ /२०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून सेवा विषयक बाबीं व इतर संदर्भात विद्यापीठाकडे तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारी साधारणत: वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, नोकरीतून काढून टाकणे इत्यादी व्यक्तिगत स्वरुपाच्या असतात.

संलग्न व स्वायत्त महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थातील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे आणि त्यांचे संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी अथवा सेवासंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी यांचे निवारणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

सबब, या परिपत्रकान्वये विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थातील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, खालील तक्तांमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या तक्रारीबाबत संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागावी/तक्रार करावी.

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७९, ८०, १०८ व १२० मधील संबंधित तरतुदी विचारात घेऊन संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांतील अध्यापक आणि इतर कर्मचाऱ्यांनी खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या तक्रार निवारणासाठी तक्रारीच्या स्वरूपानूसार संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागावी:—

| अ. क्र. | तक्रारीचे स्वरुप | दाद माण्यासाठीचे प्राधिकरण |
|---|---|---|
| १. | विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यता प्राप्त संस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी आणि संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी (व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरुन काढून टाकले असेल किंवा अन्यथा सेवा समाप्त केली असेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले असेल किंवा पदानवत केले असेल) अशा विवादांच्या अभिनिर्णयासाठी तसेच तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने व्यथित झाला असेल याकरिता. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, ८० नुसार विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण. |
| २. | विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यता प्राप्त संस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या राज्य शासन व त्यांचे अधिकरी यांच्या विरुध्दच्या तक्रारी व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या तक्रारी. (व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरुन काढून टाकले असेल किंवा अन्यथा सेवा समाप्त केली असेल किंवा सक्तीने सेवा निवृत्त केले असेल किंवा पदावनत केले असेल या खेरीज करुन इतर सर्व तक्रारी) | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, ७९ नुसार घटित केलेली तक्रार निवारण समिती. |

| | | |
|---|---|---|
| ३. | व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांतील अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या तक्रारी | AICTE (Redressal of Grievance of Faculty/Staff Member) Regulation, २०२१ अन्वये गठित संबंधित महाविद्यालय /मान्यता प्राप्त संस्थांच्या पातळीवर घटित संबंधित महाविद्यालय /मान्यताप्राप्त संस्थेच्या पातळीवर घटित समिती. |

२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील उपरोक्त नमूद तरतुदींस अनुसरून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये तसेच मान्यताप्राप्त परिसंस्था यामधील अध्यापक व इतर कर्मचारी यांना त्यांच्या व्यक्तिगत स्वरूपाच्या तक्रारींबाबत, त्या तक्रारीसंबंधीचे अधिकारक्षेत्र विचारात घेऊन तक्रार निवारण समिती अथवा विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण यांच्याकडे दाद मागावी लागेल.

३) संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यामध्ये प्रशासकीय, विद्याविषयक अथवा वित्तीय कामकाजासंबंधी अनियमितता किंवा विवाद असेल व त्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या अध्यापक वर्गाच्या व अध्यापकेतर कर्मचारी वर्गाच्या हितास बाधा येत असेल तर अशा सामाईक स्वरूपाच्या तक्रारी विद्यापीठास प्राप्त झाल्यास, विद्यापीठ स्तरावर अशा तक्रारींची चौकशी करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२० नुसार संलग्नीकरण अथवा मान्यता काढून घेण्याची अथवा सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. १ नुसार संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांचेविरूध्द कसूरदार संलग्न महाविद्यालये /मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्तीभंगविषयक कारवाई करता येईल.

परिपत्रक क्र. २७१/२०२१ जा.क्र. सीसीओ/१९३३, दि. २१/०९/२०२१ अधिक्रमित करण्यात येत आहे.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जा. क्र. सीसीओ/ 523 )
दि. 22/02/2023 )

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक

} आपणास निर्देशित करण्यात येते की, परिपत्रकातील तक्ता जसाच्या तसा सूचना फलक स्वरुपात तयार करून महाविद्यालय/ परिसंस्थेत दर्शनी भागात लावण्यात यावा. तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.